The Founder President



Late. Barrister A. R Antulay

KONKAN UNNATI MITRA MANDAL'S

# VASANTRAO NAIK COLLEGE OF ARTS & COMMERCE

Late. Barrister A. R. Antulay Educational Campus,
Murud - Janjira, Dist- Raigad, 402401 (MS),
Reaccredited With 'B' Grade by NAAC

*ICSSR SPONSORED*

**One Day National Interdisciplinary Conference on**

# *"Relevance of Tourism and its impact in Development in emerging economy of India with special reference to Maharashtra"*

On Saturday 29th July 2017

Special Issue of an International

**SCHOLARLY RESEARCH JOURNAL FOR INTERDISCIPLINARY STUDIES**

Impact Factor SJIF (2016) - 6.177
UGC Approved Sr. No. 45269, ISSN- 2319-4766

CONVENER & CO ORDINATOR

**Dr. S. P. Rangoonwala,**
Principal, V. N. College, Murud - Janjira
Web-Site: vncmj.edu.in
E-mail: vrnaikcollege@gmail.com

| | | |
|---|---|---|
| 62 | **महाराश्ट्रातील पर्यटन व पर्यटन विकास**<br>*डॉ. सुधाकर चंपतराव लहुपचांग* | 280-284 |
| 63 | **'महाराश्ट्रातील पर्यटन विकासांचा आर्थिक विकासावर झालेला परिणाम**<br>*प्रा. डॉ. तानाजी लोखंडे* | 285-288 |
| 64 | **कोकणाचा ऐतिहासिक वारसा व निसर्ग सौंदर्य पर्यटन उदयोगाला पुरक**<br>*प्रा. डॉ. सुभाश लक्ष्मण म्हात्रे* | 289-291 |
| 65 | महाड एक ऐतिहासिक पर्यटनाचा वारसा लाभलेले नामवंत ठिकाण<br>*प्रा. तुळशीदास मोकल* | 292-295 |
| 66 | पंढरपूर– एक पर्यटन स्थळ<br>*प्रा. डॉ. स्वराली चंद्रकांत कुलकर्णी* | 296-299 |
| 67 | भारताच्या विकासात किल्ल्यांची भूमिका<br>*प्रा. डॉ. संजय उत्तम बेंद्रे* | 300-302 |
| 68 | पर्यटनाचे अर्थशास्त्रीय व सामाजिक विष्लेशण<br>*प्रा भोसले कानिफ सदाशिव* | 303-306 |
| 69 | **महाराष्ट्रातील आदिवासी महादेवकोळी जमातीचे भौगोलीक निवास्थान, उदरनिर्वाह आणि पर्यटनातून विकास**<br>*प्रा. श्री. यशवंत ढवळा भांडकोळी* | 307-313 |
| 70 | **महाराश्ट्रातील पर्यटन आणि रोजगार निर्मिती**<br>*श्री. मुरलीधर पंडीत गायकवाड* | 314-318 |
| 71 | कोकणातील पर्यटन व्यवसायाचा आर्थिक अभ्यास<br>*प्रा. दत्ता उत्तमराव कुंटेवाड* | 319-321 |
| 72 | **म्हसळा तालुक्यातील अविकसित पर्यटन स्थळांचे आर्थिक व सामाजिक विकासातील महत्व**<br>*प्रा. श्री. शिरीष चंद्रकांत समेळ* | 322-329 |
| 73 | आर्थिक पर्यटन<br>*रसिका म्हात्रे & सुप्रिया सु. पाटील* | 330-333 |
| 74 | **ग्रामीण पर्यटन**<br>*प्रा. डॉ. स्मिता मनोज भोईर* | 334-336 |

# पंढरपूर – एक पर्यटन स्थळ

**प्रा.डॉ.स्वराली चंद्रकांत कुलकर्णी**, *टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, इतिहास विभाग, पुणे*
*ईमेल drswaralikulkarni@gmail.com*

आधुनिक काळात आंतरराष्ट्रीय पातळीवर पर्यटन क्षेत्राला महत्वाचा व्यवसाय म्हणून दर्जा प्राप्त झाला आहे. व्यक्तिगत विकासासाठी नवीन विषयाचे ज्ञान संपादन करण्यासाठी, सामाजिक, ऐतिहासिक, धार्मिक आणि राजकीय घटनांचा मागोवा घेण्यासाठी पर्यटन केले जाते.दुसऱ्या महायुद्धानंतरच्या काळात संयुक्त राष्ट्रसंघटनेने आपल्या विविध संस्थांच्या मार्फत आंतरराष्ट्रीय स्तरावर पर्यटनाला अनुकुल वातावरण निर्माण करण्यासाठी कायदे केले. आंतरराष्ट्रीय पातळीवर वेगवेगळ्या देशातील 86 पर्यटन संस्था कार्यरत आहेत. इ. स.1960 पासून भारत सरकारने भारतीय पर्यटन संस्थेची स्थापना करुन पर्यटनाला उत्तेजन दिले आहे. आज प्रत्येक राज्यात पर्यटन खाते कार्यरत असून खाजगी पातळीवर देखील काही संस्था पर्यटनाचे काम करीत आहेत. पर्यटनामुळे देशाच्या विकासाला निश्चितपणे चालना मिळते.

**पर्यटनाची व्याख्या** – वेगवेगळ्या इतिहासकारांनी पर्यटनांची व्याख्या वेगवेगळी केली असली तरी एकंदरीत व्यक्तिने एखाद्या शहरामध्ये 24 तासापेक्षा अधिक काळ व्यतीत करणे, आपल्या राज्यातून दुसऱ्या राज्याचा प्रवास करीत असताना तेथील सामाजिक आणि सांस्कृतिक जीवनाचे आणि ऐतिहासिक घटनांचे निरीक्षण करते या पद्धतीला 'पर्यटन' म्हटले जाते. आजच्या दैनंदिन जीवनामध्ये व्यक्तिला बदलांची आवश्यकता वाटते. जिज्ञासेपोटी एखाद्या अज्ञात गोष्टीचे ज्ञान प्राप्त करुन घेण्याची वृत्ती आपल्यामध्ये असते, त्यातून पर्यटनाला चालना मिळते. पर्यटनालाही प्राचीन काळापासून फार मोठा इतिहास आहे.

पंढरपुर हे महाराष्ट्राचे धर्मह्रदय आहे. सर्व समन्वयाचे क्षेत्र म्हणुनही पंढरपुर ओळखले जाते. पर्यटन स्थळ म्हणूनही पंढरपुरचे महत्व आहे.

पंढरपुरचे विठ्ठल मंदिर – महाराष्ट्रातील प्रमुख दैवत म्हणून विठ्ठलमूर्ती आणि मंदिराचा उल्लेख केला जातो. तीर्थक्षेत्राच्या दृष्टीकोनातून पंढरपुर सुरुवातीपासुनच प्रसिद्ध आहे. प्राचीन काळापासून पंढरपुरची वारी असल्याचे उल्लेख ग्रंथातून मिळतात. () जेव्हा नव्हते चराचर। तेव्हा होते पंढरपुर । असा उल्लेख संत नामदेवांनी आपल्या अभंगात केला आहे. मात्र ज्ञानेश्वरांनी वारकरी संप्रदायाला तात्विक अधिष्ठान देवून सामुदायिकरित्या पालखीची / पंढरपुर वारीची प्रथा सुरु केली. आषाढी, कार्तिकी, माघी, चैत्री या 4 प्रमुख वारीला लाखो लोक पंढरपुरला येतात. शिवाय दररोजही हजारो लोक विठ्ठल दर्शनासाठी आणि पंढरपुरातील इतर स्थळे पहाण्यासाठी येत असतात. त्यामुळे पर्यटनदृष्ट्या पंढरपुर हे महत्वाचे स्थळ आहे. पंढरपुरला येणाऱ्या लोकांच्या संख्येत दिवसेंदिवस वाढ होत आहे. महाराष्ट्राबरोबरच आंध्र, कर्नाटक आणि मध्यप्रदेश येथून पर्यटक मोठ्या प्रमाणावर पंढरपूरला येतात. पंढरपूरला जाण्यासाठी दळणवळण व यात्रेकरांना रहाण्यासाठी चांगली सुविधा आहे. त्यामुळे जवळपास 20 लाखाच्या आसपास पर्यटक / वारकरी पंढरपुरला येतात. सामाजिक अभिसरण, सांस्कृतीक जतन आणि राष्ट्रीय एकात्मतेच्या दृष्टीने पंढरपुरला महत्वाचे स्थान आहे. पर्यटन म्हणून पंढरपुरचा विचार करीत असताना विठ्ठल मुर्ती आणि मंदिराचा अभ्यास करणे महत्वपुर्ण ठरते.

**विठ्ठल मुर्तीचा इतिहास–** विठ्ठलमुर्तीच्या अस्तित्वाबद्दल इतिहासकारांमध्ये मतभिन्नता आहे. मंदिरातील शिलालेख पंढरपुरात सापडलेले शिलालेख, विजयनगर, म्हैसूर, होयसळ राज्याची कागदपत्रे या सर्वांवरुन आपणास विठ्ठल मुर्तीचा अभ्यास करता येतो.

1. वैदिक ग्रंथामध्ये पंढरपुर येथील विठ्ठलाची मूर्ती ही विष्णूची मुर्ती आहे असा उल्लेख मिळतो. परंतु इतिहासकारांना हे मत मान्य नाही. कारण 11व्या शतकापासून विठ्ठल मुर्ती येथे असल्याचे उल्लेख अनेक साहित्यातून मिळतात.
2. संत ज्ञानेश्वर महाराजांपुर्वी पंढरपुरची विठ्ठल मुर्ती असल्याचे उल्लेख आहेत. बंगालमधील वैष्णव संत चैतन्यस्वामी, दक्षिण भारतात कोल्हापूर व पंढरपूर तीर्थक्षेत्राला भेट दिल्याचा उल्लेख मिळतो. पंढरपूर येथे त्यांनी किर्तन केल्याचाही उल्लेख आढळतो.
3. विजयनगरचे राजा कृष्णदेवराव यांनी विठ्ठलमुर्ती पंढरपूरहून आणून तुंगभद्रेकाठी मंदिर बांधून प्रतिष्ठापित केली असे म्हटले जाते परंतु संत एकनाथांचे आजोबा भानुदास महाराज यांनी परत पंढरपूरला आणली असा उल्लेख आढळतो.
4. ग.ह. खरे यांच्या मते, पंढरपुर विठ्ठल मुर्तीची स्थापना होयसळ राजा विष्णूवर्धन याने केली आहे. याशिवाय काही संशोधकांनी विठ्ठलमुर्ती ही बुद्धाची मूर्ती आहे तर काहींनी तीर्थंकर नेमीनाथ यांची आहे असे म्हटले आहे. एकंदरीत सर्व गोष्टींचा विचार करुन पंढरपुरातील मूर्ती ही विठ्ठलाची असून ती 11 व्या शतकातील आहे याबद्दल इतिहासकारांमध्ये एकमत आहे.

**विठ्ठल मूर्ती आणि मंदिर रचना –** पंढरपूरात मध्यवस्तीत विठ्ठल मंदिर असून मंदिर लांबी 350 फुट, रुंदी 170 फूट आहे., पूर्वेस तीन, दक्षिणेस एक, उत्तरेस 4 असे एकूण 8 दरवाजे आहेत. पूवेकडिल मुख्य दरवाज्यास महाद्वार म्हणतात. या दरवाज्याच्या पायरीजवळच चोखोबांची समाधी आहे. तेथेच नामदेव पायरी आहे. मुख्य दरवाज्यातून आत सभा मंडपात दोन दीपमाळ व एका बाजूला गरुड आणि मारुतीची मूर्ती आहे. यानंतर 16 खांबी मंडप आहे. यानंतर गाभाऱ्यात श्रीविठ्ठलाची मूर्ती आहे. विठ्ठलाची मूर्ती साडेतीन फूट काळ्या पाषाणाची, दोन्ही कटेवर कर ठेवून उभी असलेली, डोक्यावर महादेवाचे लिंग, कौस्तुभ मणी, कमरपट्टा, दंडात बाहूभूषणे असलेली अप्रतिम आहे.

**पंढरपुरचे पर्यटन दृष्टिकोनातुन महत्व –** हजारो लोक पंढरपूरातील श्री विठ्ठल मूर्तीचे दर्शन घेण्यासाठी आणि मंदिर पहाण्यासाठी येतात. काही विदेशी पर्यटकही येतात. याशिवाय पंढरपूरात चंद्रभागा, तिच्या काठावरील घाट आणि पुंडलिक मंदिर पहाण्यासाठी लोक येत असतात. विविध मुर्ती आणि माहितीयुक्त असे कैकाडी महाराज आणि तनपुरे महाराज यांचे मठ हे ही प्रेक्षणीय आहेत. त्यामुळे धार्मिक सामाजिक आणि सांस्कृतीक दृष्टी बाबी पहाण्यासाठी पर्यटक/वारकरी पंढरपुरास भेट देतात. याशिवाय पालखी सोहळाही आषाढी एकादशीस पंढरपूरला होत असल्याने पंढरपुरला पर्यटनदृष्ट्या महत्वपूर्ण स्थान आहे.

**दळणवळण वाहतुकीची सोय–** अलिकडे दळणवळणाची साधने मोठ्या प्रमाणावर झालेली आहेत. पंढरपूर हे तीर्थक्षेत्र असल्याने पर्यटकांना या ठिकाणी जाणे–येणे सोपे व्हावे म्हणून रस्ते व रेल्वे मार्गाची सोय करण्यात आली आहे. महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्ह्यातून पंढरपूरला येण्यासाठी एस.टी.बस, खाजगी बस व इतर वाहनांची सुविधा उपलब्ध आहे. लातूर-मिरज आणि मुंबई–पुणे रेल्वेमार्ग आहे. आंध्र कर्नाटक मध्यप्रदेशातून पंढरपूरला येण्यासाठी

दळणवळणाची साधने उपलब्ध झाल्याने पर्यटकांच्या संख्येत मोठ्या प्रमाणावर वाढझालेली आहे. याशिवाय पंढरपूरला पर्यटकांच्या रहाण्याचीही चांगली सोय आहे. या ठिकाणी विविध धार्मिक संस्थांच्या मार्फत मठ व धर्मशाळा आहेत. तसेच प्रत्येक दिंडीचे स्वतचे मठ आहेत. याशिवाय विविध राज्यांची भक्तनिवासातून पर्यटकांची रहाण्याची व जेवणाची सोय होते. अशा प्रकारे निवासाची सोय आणि दळणवळणाची चांगली साधने यामुळे पंढरपुरला भेट देणाऱ्या पर्यटकांच्या संख्येत मोठी वाढझाल्याचे दिसून येते.

**यात्रा महोत्सव–** पंढरपूरला दररोज, पंधरा दिवसाची एकादशी, महिन्याच्या एकादशीला येणाऱ्या वारकरी आणि इतर पर्यटकांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. आत्मिक समाधान मिळविण्यासाठी वारकरी पंढरपुरला येतात. सर्वात मोठी आषाढी व कार्तिकी वारीच्या काळात आठवडाभर हा यात्रा उत्सव असतो. या काळात लाखो लोक पंढरपूरच्या आसपास व पंढरपूर परिसरास भेट देवून आनंद मिळवितात. काही वस्तूंची खरेदी करतात. या काळात आणि दररोजही पंढरपूरात कोट्यावधींची आर्थिक उलाढाल होते. कुंकू, बुक्का, अष्ठगंध, चुरमुलरे, बत्तासे आणि लाकडी खेळणी अशा घरगुती व्यवसायांना चालना मिळते. याशिवाय विविध प्रकारचे अलंकार, धातूची भांडी, तुळशीमाळ, फुलांचा व्यापार यासारख्या स्थानिक उद्योगामुळे येथे बेरोजगारी मोठ्या प्रमाणावर आढळत नाही. पर्यटनामुळे हे शक्य झालेले आहे.

पंढरपूरला येणारा प्रत्येक पर्यटक हा आपली जात–धर्म विसरुन वारीत सहभागी होतो. एवढेच नव्हे तर पंढरपूरातील स्थानिक मुस्लिम एकादशी करतात. हे राष्ट्रीय एकात्मते प्रतिक नव्हे तर काय? राज्य सरकार आणि केंद्रसरकारच्या माध्यमातून विविध प्रकारच्या सुख सुविधा उपलब्ध करुन दिल्या जातात.

चंद्रभागा नदी प्रदूषणमुक्त करण्यासाठी काही तरी प्रयत्न केले गेले पाहिजेत असे मला वाटते त्यामुळे निश्चित पर्यटकांच्या संख्येत जास्त वाढ होईल.

पर्यटनाचे महत्व

1. पर्यटनामुळे रोजगाराच्या संधी उपलब्ध होतात.
2. पंढरपूर शहराच्या आर्थिक विकासाबरोबरच राष्ट्राच्या विकासासही मदत होते.
3. पर्यटनामुळे सामाजिक ऐक्य आणि राष्ट्रीय एकात्मता साधली जाते.
4. पर्यटनामुळे संस्कृतीची माहिती सर्वांना मिळते, महाराष्ट्रीय संस्कृती जपण्याचे महत्वपूर्ण कार्य केले जाते.
5. संस्कृतीची देवाणघेवाण आणि विचारांचे आदानप्रदान केले जाते.

**संदर्भ साधने –**

*राणा पंढरीचा, डॉ.गोपाळ बेणारे, श्रीसंत वाङमय उपासक मंडळ, पंढरपूर, 1993.*
*सोलापूर जिल्ह्याची बखर, गोपाळ देशमुख, रेमू प्रकाशन, पुणे–, 1984*
*श्री पंढरपूर महात्म्य, डॉ. अरुण वाडेकर, सरस्वती पब्लिकेशन्स,पुणे 1993*
*दिंड्या गावोगावच्या, ॲड. बाबुराव हिरडे, स्नेहवर्धन प्रकाशन,पुणे 2012*
*भारतीय संस्कृती कोष खंड, 6, 9, महादेव शास्त्री जोशी, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, पुणे–1990*
*सोलापूर डिस्ट्रीक्ट गॅझेटियर, 1977, गौड पी.टी., गव्हर्मेंट ऑफ महाराष्ट्र, मुंबई 1977*
*महाराष्ट्र समाज आणि संस्कृती, डॉ. अ.रा.कुलकर्णी, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे–2008*
*श्री विठ्ठल एक महासमन्वय, रा.चि.ढेरे, श्रीविधा प्रकाशन, पुणे2001.*
*पंढरपूरा नेईन गुढी, स.कृ.जोशी, लाखानी बुक डेपो, मुंबई–1954*
*पंढरपूर शहरातील ऐतिहासिक स्मारके, डॉ. स्वराली कुलकर्णी, जूलू प्रकाशन, सोलापूर, 2015.*
*पालखी सोहळा, नेऊरगावकर सदाशिव, श्रीसंत वाङमय उपासक मंडळ पंढरपूर, 1972*
*संताचे माहेर विमल भिसे, मराठी ग्रंथ संग्रहालय, हैद्राबाद 1964*

*विठ्ठल रुक्मिणी, डॉ.सरोजिनी बाबर, महाराष्ट्र राज्य लोकसाहित्य समिती, मुंबई 1977*
*विठ्ठल स्थापनेची मीमांसा, अ.व्यं. सावजी, संपा. सौ.मावजी, पुणे–1965*
*सचित्र पंढरपूर, यशवंत रामकृष्ण पंढरपूरातील प्राचीन शिलालेख लेखमाला–*
*पंढरपूरचे सांस्कृतिक वैभव, डॉ.जयश्री रणनवरे, अक्षरलेख प्रकाशन, सोलापूर 2009*